सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# (सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७०)

# महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम

(५ जून २०१३ पर्यंत सुधारित)

# (Bom. LXX of 1953)

# The Maharashtra Service Inams (Useful to Community) Abolition Act

*(As modified upto the 5th June 2013)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले.

२०१३

[किंमत : रुपये ११.००]

# महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम

## अनुक्रमणिका

उद्देशिका.

कलमे.

१. लघुसंज्ञा, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. सेवा इनामे व अशा इनामांच्या बाबतीतील हक्क रद्द करणे.

४. सेवा इनाम गावांची व जमिनींची जमीन महसूल देण्याची जबाबदारी व तो देण्यास जबाबदार असलेले इसम.

५. सेवा इनाम जमीन परत घेणे व ती धारण करणाऱ्यास पुन्हा देणे.

६. जमीन महसूल किंवा रोकड भत्ता याऐवजी नुकसानभरपाई.

७. जमिनीवरील इतर हक्क रद्द करणे वगैरेबद्दल नुकसानभरपाई देण्याची रीत.

८. न्यायालय शुल्क.

९. जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या निवाड्यांचे व महसूल न्यायाधिकरणाच्या निकालांचे निर्णायकत्व.

१०. चौकशी व कामकाजे ही न्यायसंबंधी कामे असतील.

१०अ. सन १९५८ चा मुंबई अधिनियम, ९३ याच्या प्रारंभापूर्वी केलेल्या निवाड्यांच्या संबंधात फेरतपासणीचे अधिकार.

११. नुकसानभरपाईची रक्कम हस्तांतरित कर्जरोख्यांच्या स्वरूपात देण्याजोगी असणे.

१२. सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६७, याचे उपबंध, धारण करणारा व कुळे यांच्यामधील संबंधास लागू असणे.

१३. नियम.

१४. विवक्षित अधिनियम लागू असण्याचे बंद होणे.

अनुसूची.

# सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७०.[१]

## [महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम]

[२२ डिसेंबर १९५३]

ह्या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९५४ चा मुंबई अधिनियम, ५८.

सन १९५५ चा मुंबई अधिनियम, ५१.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम, ९३.

महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ (६-५-२००२)†

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९

**मुंबई राज्याच्या विवक्षित भागांतील समाजास उपयुक्त असणारी सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** जनतेच्या हिताच्या दृष्टीने मुंबई राज्याच्या विवक्षित भागांत समाजास उपयुक्त असलेली सेवा इनामे रद्द करणे आणि यांत यापुढे निर्दिष्ट केलेल्या इतर आनुषंगिक व परिणामभूत बाबींसाठी तरतूद करणे आवश्यक व इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :—

लघुसंज्ञा, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, [२][महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम] असे म्हणावे.

(२) तो, पूर्वी, खानदेश, दक्षिण व दक्षिण मराठा देश मिळून बनलेल्या व त्यानंतर, राज्ये (राज्यपालांचा प्रांतांत) विलीन करण्याबाबत आदेश सन १९४९ यापूर्वी अस्तित्वात असलेले पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, अहमदनगर, नाशिक, पुणे, सातारा, सोलापूर, विजापूर, बेळगाव, कन्नड, धारवाड या जिल्ह्याचा भाग बनलेल्या प्रदेशांना लागू असेल.

(३) तो, राज्य सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबत नेमील त्या तारखेस [३] अंमलात येईल.

व्याख्या.

२. (१) विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, ह्या अधिनियमांत,—

(अ) " नेमलेला दिवस " या संज्ञेचा अर्थ, ज्या दिवशी हा अधिनियम अंमलात येईल तो दिवस, असा समजावा ;

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, **मुंबई शासन राजपत्र,** १९५३, भाग पाच, ई. पृष्ठ ४५८-४५९ पहा.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, अनुसूचीद्वारे अधिनियमाच्या नावात बदल करण्यात आला.

[३] १ एप्रिल १९५४ (शासकीय अधिसूचना, ग्रामविकास क्र. ८८२४/४५-दोन, दिनांक १६ फेब्रुवारी १९५४).

(शा.म.मु.) एच ४१०३–२ (५,५९७–७-२०१३)

(ब) " संहिता " या संज्ञेचा अर्थ, मुंबई जमीन महसूल अधिनियम, सन १८७९, असा समजावा ;

(क) " कलेक्टर " या संज्ञेत राज्य शासनाने या अधिनियमान्वये कलेक्टरची कर्तव्ये पार पाडण्यासाठी व त्याचे अधिकार चालविण्यासाठी नेमलेला अधिकारी यांचा समावेश होतो ;

(ड) " धारण करणारा " या संज्ञेचा अर्थ, (" कनिष्ठ धारक " या संज्ञेत असेल ते खेरीजकरून) सेवा इनाम धारण करणारा इसम, असा समजावा व तीत त्याच्या वतीने किंवा त्याच्या मार्फत वैधरीतीने धारण करणाऱ्या कोणत्याही इसमाचा समावेश होतो ;

(इ) " सेवा इनाम गाव " किंवा " सेवा इनाम जमीन " या संज्ञेचा अर्थ, समाजोपयोगी सेवेबद्दल एखाद्या इसमाने इनाम म्हणून धारण केलेले यथास्थिति, गाव किंवा गावाचा भाग किंवा जमीन, असा समजावा ;

(फ) " सेवा इनाम " या संज्ञेचा अर्थ—

(१) समाजोपयोगी सेवेबद्दल धारण केलेल्या व संहितेच्या ५३ व्या कलमान्वये ठेवलेल्या अन्य संक्रामण नोंदवहीत " वर्ग ६चे ग्रामीण जनतेस उपयुक्त असे गाव सेवक " म्हणून दाखल केलेल्या गावाचे, गावाच्या भागाच्या जमिनीचे अनुदान किंवा जमीन महसुलाच्या संपूर्ण किंवा अंशतः माफीचे अनुदान ;

(२) समाजोपयोगी सेवेबद्दल राज्य सरकारने रोकड म्हणून देण्याजोगी कोणतीही गोष्ट धरून पैशाचे किंवा जमीन महसुलाचे अनुदान असा समजावा.

(ग) " विहित " या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले ;

(ह) " अनुसूची " या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा समजावा ;

(आय) या अधिनियमांत वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांचा व संज्ञांचा संहितेत त्यांना जो अर्थ दिला असेल तोच अर्थ असेल ;

(२) कोणतेही अनुदान सेवा इनाम आहे किंवा कसे याविषयी कोणताही प्रश्न उद्भवल्यास राज्य सरकारने अन्यसंक्रामण दप्तरांतील संबंधित नोंदी विचारांत घेऊन व योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्या प्रश्नांचा निर्णय दिला पाहिजे व असा निर्णय अखेरचा असेल :

परंतु, राज्य सरकार अशा प्रश्नाचा निर्णय देण्याचा अधिकार कोणत्याही अधिकाऱ्यास देऊ शकेल व राज्य सरकारकडे करावयाच्या अपिलास अधीन राहून त्याचा निर्णय अखेरचा असेल.

सेवा इनामे व अशा इनामांच्या संबंधातील हक्क रद्द करणे.

**३.** कोणताही विधि, वहिवाट, कबुलायत, अनुदान, सनद किंवा आदेश यांत काही असले तरीही नेमलेल्या दिवसापासून व त्या दिवशी—

(१) सर्व सेवा इनामे रद्द करण्यात आली आहेत असे समजले पाहिजे व त्या संबंधीचे सर्व आनुषंगिक संबंध हे नष्ट करण्यात आले आहेत असे समजले पाहिजे ;

(२) उक्त इनामांच्या संबंधांतील पद धारण करण्याचे सर्व हक्क व सेवा करण्याची कोणतीही जबाबदारी याअन्वये नष्ट करण्यात आली आहे.

४. सेवा इनाम गावांची व जमिनींची जमीन महसूल देण्याची जबाबदारी व तो देण्यास जबाबदार असलेले इसम :— सेवा इनाम गावांची व जमिनींची जमीन महसूल देण्याची जबाबदारी व तो देण्यास जबाबदार असलेले इसम.

१८५२ चा ११. (१) मुंबई खंड माफ भू-संपत्ति अधिनियम सन १८५२ यांतील अनुसूची ब नियम (८) अन्वये विहित केलेली सर्व सेवा इनाम गावे व सेवा इनाम जमिनी ही सदरहू अधिनियम व त्याअन्वये केलेले नियम यांच्या उपबंधानुसार जमीन महसूल देण्यास पात्र आहेत व असतील व सदरहू अधिनियम व बिनदुमाला जमिनीसंबंधीचे नियम याचे उपबंध अशा गावांना व जमिनींना लागू होतील.

(२) पोट-कलम (१) लागू असलेल्या सेवा इनाम जमिनीच्या बाबतीत—

(अ) जेव्हा अशी जमीन धारण करणारांच्या जवळ असेल किंवा त्याच्या वतीने धारण करणाऱ्या (कनिष्ठ धारण करणारा खेरीजकरून इतर) इसमाच्या जवळ असेल तेव्हा सदरहू धारण करणारा, आणि

(ब) जेव्हा अशी जमीन फक्त वार्षिक आकारणी घेऊन ती धारण करीत असलेल्या कनिष्ठ धारकाच्या ताब्यात असेल तेव्हा असा कनिष्ठ धारक—

त्याने धारण केलेल्या अशा जमिनीच्या संबंधात देणे असलेला जमीन महसुलाबद्दल प्रथमतः राज्य सरकारला जबाबदार असेल व उक्त संहितेन्वये किंवा त्याअन्वये केलेल्या नियमांनी किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर विधिअन्वये भोगवटा करणारा म्हणून अशा जमिनीच्या संबंधांत सर्व हक्क त्यास असतील व सर्व जबाबदाऱ्यास तो पात्र असेल.

१८५२ चा ११. ५. (१) मुंबई खंड माफ भूसंपत्ती अधिनियम सन १८५२ यांतील अनुसूची (ब) व नियम ८ याअन्वये ज्यांच्यासंबंधी निर्णय देण्यात आलेला नसेल अशा सर्व सेवा इनाम जमिनी याअन्वये परत घेण्यात आल्या आहेत व त्या सदरहू संहिता व त्याअन्वये केलेले नियम यांच्या उपबंधान्वये जमीन महसूल देण्यास पात्र ठरतील व सदरहू संहिता व बिनदुमाला जमिनीसंबंधी नियम यांचे उपबंध अशा जमिनींना लागू असतील. सेवा इनाम जमीन परत घेणे व ती धारण करणाऱ्यास पुन्हा देणे.

(२) [1][पोट-कलम (१)] च्या उपबंधान्वये ताब्यात घेतलेली सेवा इनाम जमीन ही तो धारण करणाऱ्यास अशा जमिनीच्या पूर्ण आकारणीच्या रकमेच्या सहा पटी इतके भोगाधिकार मूल्य नेमलेल्या दिवसापासून [2][पाच वर्षांच्या] आत भरल्यावर परत देण्यात आला पाहिजे व अशा जमिनीच्या संबंधात धारण करणारा हा संहितेच्या अर्थानुसार भोगवटा करणारा म्हणून समजण्यात येईल व तो संहितेच्या व त्याअन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधास अनुसरून राज्य सरकारास जमीन महसूल प्रथमतः भरण्यास जबाबदार होईल :

परंतु, जर सदरहू धारण करणारा हा ह्या कलमात तरतूद केल्याप्रमाणे भोगाधिकार मूल्य [2][पाच वर्षांच्या] मुदतीत देण्यात कसूर करील तर तो सदरहू जमिनीचा अनधिकृतपणे भोगवटा करीत आहे असे समजण्यात आले पाहिजे व त्यास संहितेच्या उपबंधानुसार संक्षिप्त चौकशी करून (जमिनींतून) काढून टाकण्यात येऊ शकेल.

[3][परंतु आणखी असे की, जमिनीच्या स्वरूपातील सेवा इनाम हे दुसऱ्याच्या नावे करून देता येण्याजोगे नसेल आणि ते प्रारंभी इनाम घेणाऱ्या व्यक्तीचा जो वंशज असेल त्या व्यक्ती व्यतिरिक्त इतर व्यक्तीच्या

---

[1] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८ याच्या कलम २, अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम ३, दुसरी अनुसूची याद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

कब्जात असेल तर त्या बाबतीत, जमीन परत देण्याच्या कारणासाठी जमिनीचा कब्जा असणाऱ्या व्यक्तीने त्याच्या किंवा त्यांच्या पूर्वस्वत्वाधिकाऱ्याच्या नावे करण्यात आलेले जमिनीचे अन्य संक्रामण हे, सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने आणि वैधरीत्या करण्यात आले होते याबद्दल समाधानकारक लेखी पुरावा सादर केला पाहिजे.]

[१][(३) [२][(अ)] मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशी करण्याबाबत, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २००० याच्या प्रारंभाच्या दिनांकास (या कलमात, यापुढे ज्याचा निर्देश "प्रारंभाचा दिनांक" असा केला आहे) किंवा त्यानंतर, पोट-कलम (१) अन्वये परत देण्यात आलेल्या जमिनीचा भोगवटा भोगवटादाराला कृषीसंबंधी प्रयोजनासाठी हस्तांतरित करता येईल, आणि अशा हस्तांतरणासाठी जिल्हाधिकारी किंवा कोणताही इतर प्राधिकारी याच्याकडून कोणतीही पूर्व मंजुरी किंवा कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असणार नाही. अशा हस्तांतरणानंतर अशी जमीन संहितेच्या तरतुदीनुसार अशा हस्तांतरिती भोगवटादाराकडून नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण करणे चालू ठेवण्यात येईल.

२००२ चा महा. २१.

[३][(ब) प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, भोगवटादाराने जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय किंवा ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय अशा कोणत्याही भोगवट्याचे कृषिसंबंधी प्रयोजनासाठी आधीच हस्तांतरण केले असेल तर, अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून त्याचे विक्री खत, बक्षीसपत्र, इत्यादींसारखे नोंदणीकृत संलेख सादर केल्यानंतर असे हस्तांतरण नियमित करता येईल. असे हस्तांतरण नियमित करण्यात आल्यानंतर अशा जमिनीचा भोगवटा संहितेच्या तरतुदींनुसार, अशा हस्तांतरिती भोगवटादाराकडून नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण करण्यात येईल :]

परंतु असे की, नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण केलेला असा कोणताही भोगवटा, प्रारंभाच्या दिनांकानंतर अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्के रक्कम शासनाला प्रदान करून भोगवटादाराला जुन्या शर्तीमध्ये (भोगवटादार वर्ग एक) रूपांतरित करता येईल, आणि अशा रूपांतरानंतर, संहितेच्या तरतुदींनुसार अशी जमीन, भोगवटादार वर्ग एक म्हणून भोगवटादाराकडून धारण करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, प्रारंभाच्या दिनांकाला, असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने, नजराणा म्हणून योग्य ती रक्कम प्रदान करून कृषीतर उपयोगासाठी आधीच हस्तांतरित करण्यात आलेला असेल तर, भोगवट्याचे असे हस्तांतरण पहिल्या परंतुकाअन्वये करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि ती जमीन, अशा हस्तांतरणाच्या दिनांकापासून संहितेच्या तरतुदींनुसार भोगवटादार वर्ग एक म्हणून भोगवटादाराकडून धारण करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :

परंतु तसेच, प्रारंभाच्या दिनांकाला असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय आणि अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्के

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३ द्वारे पोट-कलम (३) दाखल करण्यात आले.

[२] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ३ द्वारे पोट-कलम (३) याच्या प्रथम परिच्छेदाला त्याचा खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या वरील कलमाद्वारे खंड (ब) समाविष्ट करण्यात आला.

रक्कम नजराणा म्हणून प्रदान करण्यात आल्याशिवाय कृषीतर उपयोगासाठी आधीच हस्तांतरित करण्यात आला असेल तर, कृषीतर उपयोगासाठी, अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्के एवढी रक्कम नजराणा म्हणून आणि अशा नजराण्याच्या पन्नास टक्के एवढी रक्कम दंड म्हणून प्रदान करण्यात आल्यावर, असे हस्तांतरण नियमित करता येईल आणि असे प्रदान करण्यात आल्यावर, भोगवटादार संहितेच्या तरतुदींनुसार भोगवटादार वर्ग एक म्हणून ती जमीन धारण करील.]

जमीन महसूल किंवा रोकड भत्ता याऐवजी नुकसानभरपाई.

६. कोणताही विधि, वहिवाट, कबुलायत, अनुदान, सनद किंवा आदेश यांत काही असले तरीही—

(१) नेमलेल्या दिवशी धारण करणाऱ्यास द्यावयाच्या रोकड भत्ता रकमेच्या सात पटी एवढी रक्कम अशा धारण करणाऱ्यास दिली पाहिजे ;

(२) ज्या जमिनीच्या किंवा गावाच्या संबंधांत सेवा इनाम हे अशा जमिनीचा किंवा गावाचा संबंध जमीन महसूल किंवा त्याचा भाग असेल त्या जमिनीच्या किंवा गावाच्या बाबतीत अशा जमीन महसुलाच्या रकमेच्या दहा पटीएवढी रक्कम धारण करणाऱ्यास दिली पाहिजे.

जमिनीवरील इतर हक्क रद्द करणे, वगैरे बद्दल नुकसान-भरपाई देण्याची रीत.

७. (१) मालमत्तेवरील कोणतेही हक्क किंवा हितसंबंध रद्द करणाऱ्या, नाहीसे करणाऱ्या किंवा त्यात फेरफार करणाऱ्या या अधिनियमाच्या उपबंधामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या व जर या अधिनियमाच्या उपबंधात अशा रीतीने हक्क किंवा हितसंबंध रद्द करण्याबाबत, नाहीसे करण्याबद्दल किंवा त्यात फेरफार करण्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची तरतूद केलेली नसेल तर अशा इसमास नुकसानभरपाई मिळण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये करावयाचा अर्ज नेमलेल्या दिवसापासून सहा महिन्यांच्या आत विहित केलेल्या नमुन्यात कलेक्टरला सादर केला पाहिजे. कलेक्टर संहितेत तरतूद केलेल्या रीतीने रीतसर चौकशी
१८९४ केल्यानंतर 'भूमि संपादन अधिनियम, १८९४' याचे कलम २३, पोट-कलम (१) व कलम २४ यात तरतूद
चा १. केलेल्या रीतीने व पद्धतीनुसार नुकसानभरपाईची रक्कम ठरविणारा निवाडा दिला पाहिजे.

[१][(२-अ) (१) जेव्हा पोट-कलम (२) अन्वये निवाडा करणारा अधिकारी ह्या अधिनियमान्वयेचा कलेक्टर असेल परंतु जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ८ अन्वये नेमलेला कलेक्टर नसेल आणि अशा निवाड्याची रक्कम पांच हजार रुपयांहून अधिक असेल तेव्हा उक्त निवाडा—

(अ) निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक नसेल तर जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ८ अन्वये नेमलेल्या कलेक्टरच्या, किंवा

(ब) निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक असेल परंतु एक लाख रुपयांहून अधिक नसेल तर कमिशनरच्या, किंवा

(क) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक असेल तर राज्य सरकारच्या,

आगाऊ संमतीवाचून करता कामा नये.

(२) जेव्हा पोट-कलम (२) अन्वये निवाडा करणारा अधिकारी या अधिनियमान्वयेचा कलेक्टर असेल आणि त्याचप्रमाणे जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ८ अन्वये नेमलेला कलेक्टरही

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९३ याच्या कलम २ अनुसूचीद्वारे पोट-कलम (२अ) समाविष्ट करण्यात आले.

असेल आणि अशा निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक असेल तेव्हा असा निवाडा,—

(अ) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक नसेल तर, कमिशनरच्या किंवा

(ब) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक असेल तर, राज्य सरकारच्या, आगाऊ अनुमतीवाचून करता कामा नये.

(३) पोट-कलम (२) अन्वयेचा प्रत्येक निवाडा भू-संपादन अधिनियम, १८९४ याच्या २६ व्या कलमात विहित केलेल्या नमुन्यात असला पाहिजे. १८९४ चा १.

(३) या कलमांतील कोणत्याही मजकुरामुळे कोणत्याही इसमास जमीन महसूल भरण्याची पूर्णत: अथवा अंशत: माफी असलेली कोणतीही सेवा इनाम जमीन ही या अधिनियमाच्या उपबंधान्वये संहितेच्या उपबंधानुसार संपूर्ण आकारणी भरण्यास पात्र म्हणून ठरविण्यात आली आहे या सबबीवर नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

(४) कलेक्टरने पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या निवाड्यामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही इसमास मुंबईचा महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९ याअन्वये रचना केलेल्या मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे निवाड्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अपील करण्याचा अधिकार आहे. १९३९ चा मुंबई १२.

(५) पोट-कलम (४) अन्वये केलेल्या अपिलाचा निर्णय करताना मुंबई महसूल न्यायाधिकरणाने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, याअन्वये प्रारंभिक न्यायालयाने दिलेल्या हुकुमनाम्यावर किंवा आदेशावर करण्यात आलेल्या अपिलांचा निर्णय करताना न्यायालयास जे अधिकार असतात व न्यायालयाकडून कामकाजाच्या ज्या कार्यरीतीचा अवलंब केला जातो तेच सर्व अधिकार चालविले पाहिजेत व त्याच कामकाजाच्या कार्यरीतीचा अवलंब केला पाहिजे. १९०८ चा ५.

(६) अपिले दाखल करण्याची मुदत मोजताना भारताचा मुदतीचा अधिनियम सन १९०८ याची कलमे ४, ५, १२ व १४ ही या कलमान्वये केलेल्या अपिलांना लागू असतील. १९०८ चा ९.

न्यायालय शुल्क.

**८.** न्यायालय शुल्क अधिनियम, १८७०, यात काही असले तरीही या अधिनियमान्वये मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे केलेल्या प्रत्येक अपिलावर विहित करण्यात येईल इतक्या किमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावलेला असला पाहिजे. १८७० चा ७.

कलेक्टरने दिलेल्या निवाड्यांचे व महसूल न्यायाधिकरणाच्या निकालाचे निर्णायकत्व.

**९.** कलेक्टरने मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे करावयाच्या अपिलास अधीन राहून दिलेला निवाडा व मुंबई महसूल न्यायाधिकरणांने अपिलावर दिलेला निकाल हा अखेरचा व निर्णायक असेल व त्यावर कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही दाव्यांत किंवा कारवाईत हरकत घेता येणार नाही.

चौकशी व कामकाजे ही न्यायसंबंधी कामे असतील.

**१०.** कलेक्टर व मुंबई महसूल न्यायाधिकरण या अधिनियमान्वये चालू असलेली सर्व चौकशी व कामकाजे ही भारतीय दंड संहिता याची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायसंबंधी कामे आहेत असे समजण्यात आले पाहिजे. १८६० चा ४५.

१९५८ चा मुंबई ९३. [1][१०-अ. जेव्हा मुंबई भू-सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५८, याच्या प्रारंभापूर्वी कलम ७ पोट-कलम (२) अन्वये कोणताही निवाडा करण्यात आला असेल आणि कलम ७ पोट-कलम (४) अन्वये अशा निवाड्याविरुद्ध कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल तेव्हा कलम ९ यात कोणताही मजकूर असला तरीही राज्य सरकारास अशा निवाड्यासंबंधीच्या चौकशीची किंवा कामकाजाची वैधता, संयुक्तिकता किंवा नियमबद्धता याविषयी स्वत:ची खात्री करून घेण्याच्या कारणाकरिता अशा चौकशीचे किंवा कामकाजाचे दप्तर मागविण्याचा अधिकार आहे आणि जर हितसंबंधित पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर अशा चौकशीच्या किंवा कामकाजाच्या वैधतेविषयी, संयुक्तिकतेविषयी किंवा नियमबद्धतेविषयी त्याची खात्री झाली नाही तर त्यास निवाडा रद्द ठरविण्याचा आणि नव्याने निवाडा करण्याविषयी कलेक्टरास निदेश देण्याचा अधिकार आहे आणि त्यानंतर निवाडा करण्यासंबंधीचे अशा निवाड्याच्या निर्णायकत्वासंबंधीचे आणि अशा निवाड्याविरुद्ध करावयाच्या अपिलासंबंधीचे या अधिनियमाचे सर्व उपबंध योग्य त्या फेरफारांनिशी अशा नवीन निवाड्यास लागू होतील.] सन १९५८ चा मुंबई अधिनियम ९३ याच्या प्रारंभापूर्वी केलेल्या निवाड्यांच्या संबंधात फेरतपासणीचे अधिकार.

**११.** या अधिनियमाच्या उपबंधान्वये देण्याजोग्या नुकसानभरपाईची रक्कम हस्तांतरित करण्याजोग्या कर्जरोख्यांच्या स्वरूपात देण्याजोगी असेल व त्यांवर असे कर्जरोखे काढल्याच्या तारखेपासून दरसाल दर शेकडा ३ या दराने व्याज मिळेल व त्याची रक्कम असे रोखे दिल्याच्या तारखेपासून वीस वर्षांच्या मुदतीत मुद्दल व व्याज यांच्या समान वार्षिक हप्त्यांनी फेड करण्याजोगी असेल. सदर रोखे विहित करण्यात येतील इतक्या किंमतीचे व अशा नमुन्यात असतील. नुकसानभरपाईची रक्कम हस्तांतरित कर्जरोख्याच्या स्वरूपात देण्याजोगी असणे.

**१२.** या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधामुळे जेथवर सदरहू उपबंध या अधिनियमाच्या उक्त उपबंधाशी कोणत्याही प्रकारे विसंगत नसतील तेथवर ते खेरीजकरून, * मुंबई कुळवहिवाट व शेतजमिनीबाबत १९४८ चा मुंबई ६७. अधिनियम, १९४८, याचे कोणतेही उपबंध कोणत्याही सेवा इनाम गावास किंवा सेवा इनाम जमिनीस किंवा धारण करणारा व त्याची कुळे यांच्या परस्पर हक्कास व बंधनास लागू होण्यास कोणत्याही प्रकारे बाध येतो असे समजता कामा नये. सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६७, याचे उपबंध, धारण करणारा व कुळे यांच्यामधील संबंधांस लागू असणे.

**१३.** राज्य सरकारास या अधिनियमाच्या उपबंध पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी नियम करण्याचा अधिकार आहे. असे नियम आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या अटीस अधीन असतील व ते अखेरचे करण्यात येतील तेव्हा **राजपत्रात** प्रसिद्ध केले पाहिजेत. नियम.

**१४.** (१) नेमलेल्या तारखेपासून व त्या तारखेस अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांचे उपबंध त्याच्या स्तंभ ४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत सर्व सेवा इनामास लागू असण्याचे बंद होतील. विवक्षित अधिनियम लागू असण्याचे बंद होणे.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही मजकुरामुळे—

(अ) नेमलेल्या दिवसापूर्वी आधीच पत्करलेल्या कोणत्याही बंधनास किंवा जबाबदारीस ;

(ब) अशा बंधनाच्या किंवा जबाबदारीच्या संबंधातील कोणत्याही कामकाजास ; किंवा

(क) उपरिनिर्दिष्ट तारखेस किंवा तत्पूर्वी कोणत्याही न्यायालयात असे कामकाज चालू असताना केलेल्या कोणत्याही कृतीस,

बाध येतो असे समजता कामा नये,

---

[1] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९३ याच्या कलम २ अनुसूचीद्वारे पोट-कलम १०अ. समाविष्ट करण्यात आले.

* आता महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिनीबाबत अधिनियम (सन २०१२ चा महा. २४)

आणि असे कोणतेही कामकाज जणू हा अधिनियम करण्यात आलेला नाही अशा रीतीने चालू ठेवता येईल व निकालात काढता येईल.

**अनुसूची**

| वर्ष | क्रमांक | लघुसंज्ञा | लागू असण्याचे कोठवर बंद होईल ते |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १८५२ .. | ११ | मुंबई खंड माफ संपत्तीबाबत अधिनियम, सन १८५२. | सबंध अधिनियम लागू असण्याचे बंद होईल. |
| १८६३ .. | २ | जमीन महसूलाच्या माफीबाबत अधिनियम, क्रमांक १ सन १८६३. | वरीलप्रमाणे |
| १८७१ .. | २३ | सेवानिवृत्तीबाबत अधिनियम, सन १८७१ | वरीलप्रमाणे |
| १९२६ .. | ११ | हिंदूंच्या धार्मिक विधिबद्दल मिळणारी उपलब्धि अवैध ठरविण्याबाबत अधिनियम, सन १९२६. | कलमे ५ व ६ |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई